गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १२० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना प्रशासन झोपले की राजकीय दबाव?

## सरकारी कार्यालयांतच आचारसंहितेचा उघड भंग, निवडणूक यंत्रणेवर गंभीर प्रश्न

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही, जालना शहरात मात्र प्रशासनाच्या नाकावर टिच्चून आचारसंहितेचा उघड भंग होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे, हा भंग चक्क तहसील कार्यालय व पंचायत समिती यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या सरकारी कार्यालयांच्या परिसरात होत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि तटस्थतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने यांच्या नावाचे व पक्षाचे उल्लेख असलेले सिमेंटचे बेंच आणि राजकीय जाहिरातबाजी असलेली वाहने सरकारी कार्यालयांच्या आवारात बिनदिक्कतपणे उभी असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणाबाबत सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी निवडणूक प्रशासनाच्या भूमिकेवर थेट बोट ठेवले आहे.

जालना तहसील कार्यालयातील वेटिंग गार्डनमध्ये बसवण्यात आलेल्या सिमेंटच्या बेंचवर वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने यांचे नाव, पद व पक्षाचा उल्लेख स्पष्टपणे कोरलेला आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, आचारसंहिता कालावधीत सार्वजनिक मालमत्तेवरील कोणतेही राजकीय नाव, चिन्ह किंवा मजकूर झाकणे अथवा काढून टाकणे बंधनकारक आहे. मात्र, ज्या ठिकाणी स्वतः निवडणूक प्रक्रियेचा कणा असलेली यंत्रणा कार्यरत आहे, त्याच ठिकाणी नियमांची पायमल्ली होत असल्याचे चित्र दिसून येते.

जर तहसील कार्यालयातच आचारसंहिता पायदळी तुडवली जात असेल, तर सामान्य नागरिकांकडून नियम पाळण्याची अपेक्षा कशी ठेवायची? असा सवाल साद बिन मुबारक यांनी उपस्थित केला आहे.





इतकेच नव्हे, तर पंचायत समिती कार्यालयाच्या अंतर्गत परिसरात वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने यांची दोन स्कॉर्पिओ वाहने उभी असल्याचेही आढळून आले आहे. या वाहनांच्या मागील काचेवर राजकीय नेत्यांचे मोठे फोटो, पक्षाचे चिन्ह आणि युवा तडफदार नेतृत्व अशा स्वरूपाचा प्रचारात्मक मजकूर स्पष्टपणे दिसून येतो.

सरकारी कार्यालयाचा परिसर पूर्णतः तटस्थ असणे अपेक्षित असताना, अशा प्रकारची राजकीय जाहिरातबाजी असलेली वाहने तेथे उभी राहणे हे थेट आचारसंहितेचे उल्लंघन ठरते. मात्र, याकडे प्रशासनाने डोळेझाक केल्याचा आरोप होत आहे.

आचारसंहिता काळात शहरात भरारी पथके सक्रिय असल्याचा दावा प्रशासनाकडून सातत्याने केला जातो. मग हीच पथके तहसील व पंचायत समितीच्या आवारात का पोहोचली नाहीत? सरकारी भिंतींवरील पोस्टर्स, बॅनर्स आणि झेंडे काढताना जी तत्परता दाखवली जाते, ती या बेंच आणि वाहनांच्या बाबतीत का दिसून आली नाही? हा दुर्लक्षाचा प्रकार अपघाती आहे की जाणीवपूर्वक, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

या प्रकारामुळे निवडणूक प्रशासनाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे राहत असून, कायद्याचे राज्य सर्वांसाठी समान आहे का? असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे. जर सत्ताधारी किंवा पान २ वर



जालना शहरातील मिशन हॉस्पिटल जवळील क्राइस्ट चार्ज येते नाताळ सणानिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. (छाया /जावेद तांबोली )



# जुन्या मोंढ्यात गाईंची चोरी

## परतूर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर शहरात पालिका निवडणुकीची धामधूम सुरू असताना गो तस्करांनी जुन्या मोंढयातील तब्बल दहा ते पंधरा नागरिकांच्या गाई चोरून नेल्या या घटनेने संपूर्ण शहरात खळबळ माजली असून शहरातील आणखी अनेक नागरिकांच्या गाईंची व ढोरांची चोरी झाल्याचा अंदाज आहे.

याबाबत हिंदुत्ववादी संघटनेच्या वतीने तीव्र राग व्यक्त करण्यात येत असून सामान्य नागरिकांमध्येही या घटनेच्या बाबतीत संताप व्यक्त करण्यात येत आहे. सदरील घटना दिनांक २० डिसेंबर च्या मध्यरात्री व मतमोजणीच्या दिवशी २१ डिसेंबर रोजी मध्ये रात्री घडलेल्या आहेत. अनेकांच्या दारासमोरील खुंटी काढून गाई चोरण्यात आल्या तर मोंढा भागात रात्री बसलेल्या गाई व इतर गोवंश जनावरांना पळविण्यात आले.

याबाबतची तक्रार आज जुना मोंढा, पंचमुखी महादेव परिसरातील,

प्रकाश मनोहर शेजूळ यांनी तक्रार दिली, त्यांची एक गाय भुरकट हारण्या रंगाची, गोल गोंडा, लांब टोकदार शिंगे, असेलेली गाय घरासमोरुन चोरुन नेली आहे. तसेच इतर नागरिकांच्या हि गायी चोरीस गेल्या आहे ते खाली प्रमाणे, वैजंताबाई भरत शेळके वय ५० वर्षे रा. पंचमुखी महादेव मंदीरजवळ परतुर यांची दि. २१ रोजी रात्री १२ वा. सराफा बाजार परतुर येथुन एक गाय तीचे वर्णन एक काळ्या रंगाची तसेच,किशोर ओमप्रकाश व्यास वय ५२ वर्षे सराफा मार्कट परतुर यांचे दोन गायी एक काळ्या पांढऱ्या रंगाची व एक काळ्या रंगाची दि.२१ रोजी रात्री १२ वाजेच्या सुमारास, दुर्गा दिगंबर भोसले वय ३० वर्षे रा. पंचमुखी महादेव मंदीरजवळ परतुर यांची दि.२० रोजी रात्री १२ वाजेच्या सुमारास एक गाय लालभुरकट रंगाची, धर्मद्र रमेश बन्सीले वय ४४ वर्षे रा.पंचमुखी महादेवमंदीर जवळ परतुर यांची दि.२१ रोजी रात्री १२ वा. सुमारास मोंढा भाग परतुर येथुन एक लाल रंगाची गाय, मनोज भारत शेळके वय ३५ वर्षे रा. पंचमुखी महादेव मंदीर जवळ मोंढा भाग परतुर येथुन दि.२० रोजी रात्री १२ वाजेच्या सुमारास एक लाल रंगाची सुटर गाय असे वरील वर्णानाच्या गायी कोणीतरी अज्ञाता चोरट्यांनी चोरुन नेल्या आहे. दि.२० ते २१ रोजी रात्री च्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्या आहेत, तरी अज्ञात चोरट्यावर कार्यावाही होवुन गायी परत मिळणेबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली आहे.

# जालना शहरात बांगलादेशविरोधात हिंदू संघटनांचे तीव्र आंदोलन

## प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे, घोषणाबाजीने परिसर दणाणला

**जालना । प्रतिनिधी -** बांगलादेशात हिंदू समाजावर होत असलेल्या कथित अत्याचारांच्या निषेधार्थ जालना शहरातील सावरकर चौकात आज हिंदू संघटनांच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात बांगलादेशविरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात आली असून, आंदोलकांनी आपला संताप उघडपणे व्यक्त केला.




या आंदोलनादरम्यान बांगलादेशचा निषेध करण्यासाठी एका प्रतीकात्मक पुतळ्याला बांगलादेशचे पोस्टर लावण्यात आले. त्यानंतर आंदोलकांनी या पोस्टरला जोडे मारून तसेच ते जाळून निषेध नोंदवला. काही कार्यकर्त्यांनी बांगलादेशचे पोस्टर व स्टीकर रस्त्यावर चिकटवून पायदळी तुडवत आपला आक्रोश व्यक्त केला. यामुळे सावरकर चौक परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

आंदोलकांचा आरोप आहे की, बनावट कागदपत्रांच्या आधारे अनेक बांगलादेशी नागरिक भारतात बेकायदेशीरपणे प्रवेश करत असून, यामुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण होत आहे. तसेच बांगलादेशात हिंदू समाजाच्या मालमत्तांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले होत असून, हिंदू नागरिकांच्या हत्या केल्या जात असल्याचा आरोप यावेळी आंदोलकांनी केला.

बांगलादेशात हिंदूंवर अन्याय, अत्याचार सुरू असताना जागतिक समुदाय गप्प का आहे? असा सवाल आंदोलकांकडून उपस्थित करण्यात आला. या सर्व घटनांच्या निषेधार्थच जालना शहरात हे आंदोलन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

**भारत सरकारकडे ठोस कारवाईची मागणी**

या आंदोलनाच्या माध्यमातून हिंदू संघटनांनी भारत सरकारकडे ठोस मागण्या मांडल्या. बांगलादेशातील हिंदू समाजाच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारने तात्काळ हस्तक्षेप करावा, तसेच बांगलादेशात हिंदूंवर होत असलेले हल्ले त्वरित थांबवण्यासाठी राजनैतिक पातळीवर दबाव टाकावा, अशी मागणी करण्यात आली. यासोबतच भारतात बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे वास्तव्यास पान २ वर

युवा आदर्श

## खेड्यात सांता...

बळीराजा त्रस्तभारी
कर्जा रंगे सात बारा
येईलं कोण मसिहा
कराया उतारा कोरा
हमी भाव नाही हमी
फक्त आश्वासन मारा
वीज बिलाचा झटका
तरीही उलटाचं तोरा
अडवणूक करे बँका
पुन्हा कर्जास नकारा
खाजगी ते सावकार
येलझरा मारती दारा
खेड्यांमधे कधी तरी
अहो सांता सैर करा
दु:खे तिथे ठासलेली
हलकी करावी जरा
मानून तुला विधाता
सण करती साजरा
सांगणार नाही वेदना
पोशिंदा जरा लाजरा
दातृत्व नसा नसात रे
बळीराजा सांताखरा
जगवे अवघ्या जगता
जाणतो भाग दुखरा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

# दिल्लीत राज्यमंत्री रघुराज सिंह यांच्याहस्ते रोहित पाचफुले यांना देशरत्न पुरस्कार प्रदान

**जालना । प्रतिनिधी -** दिल्ली येथील भरतमंडपम येथे मंगळवार दि. २३ डिसेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय सन्मान सोहळ्यात जालना येथील समाजसेवी रोहित मनोजराव पाचफुले यांना उत्तरप्रदेशचे राज्यमंत्री तथा कामगार व सेवायोजन विभागाचे अध्यक्ष रघुराज सिंह रियल हिरोज ऑफ द नेशन - देशरत्न २०२५ हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्याला भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीय सह-प्रभारी विनय चौधरी, भारत सरकारच्या दळणवळण मंत्रालयाच्या अख्यारीतील तांत्रिक सल्लागार समितीचे सदस्य मुस्तफा मुन यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजकार्य, जनजागृती तसेच वंचित व उपेक्षित घटकांच्या विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या रोहित पाचफुले यांच्या कामाची ही राष्ट्रीय पातळीवरील ठोस दखल आहे. 'रिअल हिरोज ऑफ द नेशन' या उपक्रमांतर्गत देशभरातील ग्रामीण व झोपडपट्टी भागात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव केला जातो. यंदा देशातील अनेक दावेदारांमधून रोहित पाचफुले यांच्या सातत्यपूर्ण, पान २ वर



# शेतकऱ्यांना इंग्रजीतील मेसेज कळतो का? डोकं ठिकाणावर ठेवून काम करा

## आ. खोतकरांनी सीसीआयच्या कर्मचाऱ्याला झापले

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांच्या कापूस खरेदीचा प्रश्न ऐन हंगामात गंभीर बनत असताना, सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) केंद्रावरील निष्काळजी कारभाराविरोधात शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी थेट हस्तक्षेप करत कर्मचाऱ्यांची कानउघाडणी केल्याची घटना आज जालन्यात घडली. ऑनलाईन स्लॉट बुकिंग ऐनवेळी रद्द झाल्याने शेतकऱ्यांना कापूस खरेदीस नकार देण्यात आल्यामुळे आमदार खोतकर चांगलेच संतापले. मंगळवार, दिनांक २३ रोजी दुपारी एक वाजता मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शेतकऱ्यांनी आपली व्यथा आमदार अर्जुन खोतकर यांच्यासमोर पान २ वर



## संपादकीय पान

### कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी...

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वासुदेव; आपल्या संस्कृतीचा, विचारांचा, संस्कारांचा आणि माणुसकीचा सांताक्लॉज

जगभरात ख्रिसमसच्या काळात सांताक्लॉज ही एक लोकप्रिय, आकर्षक व काल्पनिक संकल्पना म्हणून ओळखली जाते. मुलांना भेटवस्तू देणारा, आनंद पसरवणारा असा सांताक्लॉजचा चेहरा आपल्या मनात ठसलेला आहे. मात्र, आपल्या महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीत याहीपेक्षा अधिक खोल अर्थ असलेला, वास्तवात जगलेला आणि खऱ्या अर्थाने चांगल्या विचारांचे गिफ्ट देणारा एक महान परंपरागत व्यक्तिमत्त्व आहे-तो म्हणजे वासुदेव. वासुदेव ही महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीतील एक अतिशय प्राचीन, समृद्ध आणि मूल्याधिष्ठित परंपरा आहे. ही केवळ भिक्षावृत्ती किंवा गाण्याची प्रथा नसून, ती समाजप्रबोधन, नीतीमूल्यांचा प्रसार आणि सांस्कृतिक जतन करणारी एक जीवनपद्धती आहे.




वासुदेव प्रामुख्याने मार्गशीर्ष महिन्यात, पहाटेच्या वेळी गावोगावी फिरतो. टाळ, चिपळ्या, मृदंग किंवा तुणतुणे यांच्या साथीने तो दारोदारी जाऊन अभंग, ओव्या व भजने गातो. त्याच्या गाण्यांची सुरुवात बहुतेक वेळा उठा उठा हो सकळिक या अभंगाने किंवा वासुदेव आला आता वासुदेव आला या गीताने होते. वासुदेवाच्या वेषात पांढरी धोतर-कोट, डोक्यावर टोपी किंवा पगडी, गळ्यात तुळशीमाळ आणि खांद्यावर पिशवी असते. त्या पिशवीत तो कोणाकडून काही घेतो; पण त्याचा हेतू भौतिक संकलन नसून समाजाशी नाते जोडणे हा असतो.

वासुदेव ही केवळ व्यक्ती नाही, तर ती एक विचारधारा, एक संस्कृती आणि एक समाजप्रबोधनाची परंपरा आहे. गावोगावी पहाटेच्या शांत वातावरणात टाळ, चिपळ्या आणि गळ्यातील पिशवी घेऊन येणारा वासुदेव लोकांच्या दारात उभा राहतो. तो कोणतीही भौतिक भेटवस्तू देत नाही; पण तो देतो सद्भावना, नीतीमूल्ये, संस्कार आणि माणुसकीचे विचार-जे कोणत्याही खेळण्यांपेक्षा, वस्तूंपेक्षा कितीतरी मौल्यवान आहेत. सांताक्लॉज मुलांना आनंद देतो, पण तो मुख्यतः भौतिक भेटींवर आधारित आहे. वासुदेव मात्र समाजातील प्रत्येक घटकाला-लहानांपासून वृद्धांपर्यंत-जीवन जगण्याची दिशा देतो. उठा उठा हो सकळिक, नारायण नारायण अशा अभंगांमधून तो माणसाला कर्म, भक्ती, प्रामाणिकपणा आणि परोपकार यांचे महत्त्व सांगतो. ही गीते ऐकून माणसाच्या मनात चांगले विचार रुजतात, आत्मपरीक्षण घडते.

महत्त्वाचे म्हणजे, वासुदेव खरा आहे-तो आपल्या मातीत जन्मलेला, आपल्या समाजातून घडलेला. त्याचे जीवन साधेपणाचे, कष्टाचे आणि त्यागाचे प्रतीक आहे. स्वतःच्या गरजा मर्यादित ठेवून तो समाजाला जागृत करण्याचे कार्य करतो. दुसरीकडे सांताक्लॉज ही संकल्पना आकर्षक असली तरी ती काल्पनिक आहे आणि उपभोगप्रधान संस्कृतीशी अधिक जोडलेली आहे. वासुदेव आपल्या अभंगांतून सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा, कर्तव्य, परोपकार यांसारखी जीवनमूल्ये सांगतो. त्याचे गीत हे लोकभाषेत असल्याने ते सर्वसामान्य माणसाच्या मनाला थेट भिडते. सांस्कृतिक वारसा जपणारी परंपरा

संतपरंपरेचा प्रभाव असलेली ही लोककला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे. वासुदेवाच्या गाण्यांतून संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांचे विचार पिढ्यान्पिढ्या पोहोचले. वासुदेव अध्यात्माला केवळ देवपूजेत न ठेवता, दैनंदिन व्यवहारात कसे उतरवावे हे शिकवतो. देवभक्ती म्हणजे माणुसकी, सेवा आणि सदाचार असल्याचा संदेश तो देतो.

वासुदेव कोणाच्या दारात गातो याला भेद नसतो-श्रीमंत-गरीब, जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन तो सर्वांना एकाच भावनेने संबोधतो. त्यामुळे समाजात समता व बंधुभावाची भावना निर्माण होते. वासुदेव पैशांपेक्षा चांगले विचार, सद्भावना व आशेचा संदेश देतो. हेच त्याचे खरे दान आहे. त्यामुळे त्याला विचारांचा दानशूर असेही म्हणता येईल. आजच्या तणावपूर्ण, भौतिकतावादी जीवनात वासुदेवाची परंपरा अधिकच उपयुक्त ठरते. तो माणसाला थांबून विचार करायला, आत्मपरीक्षण करायला आणि माणुसकी जपायला शिकवतो. आधुनिक माध्यमांच्या गोंगाटात हरवत चाललेल्या मानवी मूल्यांची आठवण वासुदेव करून देतो.

वासुदेवाची परंपरा आपल्याला सांगते की, आनंद हा वस्तूंमध्ये नसून विचारांमध्ये आणि मूल्यांमध्ये असतो. त्याच्या पिशवीत खेळणी नसतात, पण त्यात असतात संस्कारांचे बीज. आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण जीवनात वासुदेवाचे विचार अधिकच आवश्यक वाटतात-जे माणसाला माणसाशी जोडतात, समाजाला एकत्र ठेवतात. वासुदेव ही केवळ एक लोकपरंपरा नसून ती महाराष्ट्राच्या आत्म्याची अभिव्यक्ती आहे. तो भौतिक भेटवस्तू न देता संस्कार, मूल्ये आणि सकारात्मक विचारांचे गिफ्ट देतो. म्हणूनच वासुदेवाची परंपरा जपणे, पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली सांस्कृतिक जबाबदारी आहे.

वासुदेव म्हणजे चालता-बोलता संस्कारविश्व आहे जो समाजाला जागृत ठेवतो. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, सांताक्लॉज जरी आनंदाचे प्रतीक असले, तरी वासुदेव हा जीवनमूल्यांचा शिक्षक आहे. सांताक्लॉज क्षणिक आनंद देतो, तर वासुदेव आयुष्यभर पुरेल असा वैचारिक ठेवा देतो. आपल्या संस्कृतीचा अभिमान जपताना, पुढील पिढीला केवळ गिफ्ट्स नव्हे तर चांगले विचार देणारा वासुदेव अधिक महत्त्वाचा आहे-हे आपण लक्षात घेतले पाहिजे. खऱ्या अर्थाने, वासुदेव हाच आपल्या संस्कृतीचा सांताक्लॉज आहे-पण तो विचारांचा, संस्कारांचा आणि माणुसकीचा सांताक्लॉज आहे.

आजचा काळ जागतिकीकरणाचा आहे. विविध संस्कृती एकमेकांत मिसळत आहेत, ही गोष्ट चुकीची नाही. परंतु या प्रवाहात आपल्या मातीत जन्मलेल्या परंपरा हळूहळू लोप पावत आहेत, ही बाब चिंताजनक आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वासुदेव होय. सांताक्लॉज ही पाश्चिमात्य संस्कृतीतील काल्पनिक संकल्पना आहे. तो आनंद, उत्साह आणि भेटवस्तू देण्याचे प्रतीक आहे. आज माध्यमे, जाहिराती आणि बाजारव्यवस्था यांमुळे सांताक्लॉज मोठ्या प्रमाणावर स्वीकारला गेला आहे. मात्र दुसरीकडे, महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीतील वासुदेवाची परंपरा हळूहळू मागे पडत चालली आहे-आणि ती खऱ्या अर्थाने चिंतेची बाब आहे.

वासुदेव ही केवळ सण-परंपरा नसून ती समाजप्रबोधनाची चालती-बोलती शाळा आहे. तो दारोदारी जाऊन कोणतीही भौतिक भेट न देता सद्विचार, संस्कार, भक्ती, प्रामाणिकपणा आणि माणुसकी यांचे बीज पेरतो. त्याचे अभंग लोकभाषेत असल्याने ते थेट सामान्य माणसाच्या मनाला भिडतात. अशा प्रकारे वासुदेव पिढ्यान्पिढ्या समाजाला नैतिक दिशा देत आला आहे. आजच्या काळात आपण मुलांना सांताक्लॉजच्या टोपी, खेळणी आणि चॉकलेट्स देतो; पण वासुदेव देत असलेले विचारांचे गिफ्ट आपण विसरत चाललो आहोत.

सांताक्लॉज हा बाजारकेंद्रित संस्कृतीचा भाग बनला आहे, तर वासुदेव हा मूल्यकेंद्रित संस्कृतीचा प्रतिनिधी आहे. त्यामुळे सांताक्लॉज जपला जातो, वाढवला जातो; पण वासुदेवाची परंपरा मात्र दुर्लक्षित राहते.

वासुदेवाची परंपरा लोप पावणे म्हणजे केवळ एक लोककला नष्ट होणे नाही, तर आपल्या सांस्कृतिक ओळखीचा, संतपरंपरेचा आणि सामाजिक एकतेचा एक महत्त्वाचा दुवा तुटणे आहे. गावकुसाबाहेर, पहाटेच्या शांततेत ऐकू येणारे वासुदेवाचे शब्द आज दुर्मिळ होत चालले आहेत. नवीन पिढीला वासुदेव माहीतच नाही, ही परिस्थिती गंभीर आहे.

म्हणूनच सांताक्लॉज चुकीचा आहे असा प्रश्न नसून आपल्या परंपरेला विसरून परकीय संकल्पनांना अतिरेकी महत्त्व देणे योग्य आहे का? हा खरा प्रश्न आहे.

सांताक्लॉज हा वैयक्तिक आनंदाचा विषय असू शकतो, पण वासुदेवाची परंपरा जपणे ही सांस्कृतिक जबाबदारी आहे. आज गरज आहे ती वासुदेव परंपरेला शाळा, महाविद्यालये, सामाजिक कार्यक्रम, ग्रामोत्सव यांतून पुन्हा जिवंत करण्याची. मुलांना वासुदेवाच्या अभंगांचा अर्थ सांगण्याची, त्यामागील मूल्ये समजावून देण्याची. कारण संस्कार बाजारातून विकत मिळत नाहीत; ते परंपरेतूनच घडतात.

म्हणूनच असे ठामपणे म्हणावे लागेल की, सांताक्लॉजपेक्षा लोप पावत चाललेल्या वासुदेवाच्या परंपरेला जपणे ही काळाची



गरज आहे. कारण वासुदेव केवळ भूतकाळ नाही, तो भविष्याला दिशा देणारा संस्कार आहे.

**- प्रा.सहदेव मोरे पाटील**
**(९६२३८८८८००)**

## पान १ वरुन

### जालना शहरात ...

असलेल्या बांगलादेशी घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी आणि अशा व्यक्तींना देशाबाहेर हकलण्यात यावे, अशी मागणीही यावेळी आंदोलकांनी लावून धरली.

**मोठ्या संख्येने उपस्थिती, घोषणाबाजीने परिसर दणाणला**

या आंदोलनात सकल बजरंग दलासह विविध हिंदू संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच हिंदू समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बांगलादेशचा निषेध असो, हिंदूंवरील अत्याचार थांबवा अशा घोषणांनी सावरकर चौक परिसर दणाणून गेला होता. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलन शांततेत पार पडल्यानंतर आंदोलकांनी आपले आंदोलन समाप्त केले.

### दिल्लीत राज्यमंत्री ...

परिणामकारक आणि मूल्याधिष्ठित समाजकार्याची निवड करण्यात आली. वडील मनोजराव पाचफुले यांच्यासोबत रोहित यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार स्वीकारताना प्रतिक्रिया व्यक्त करताना रोहित पाचफुले म्हणाले की, हा सन्मान केवळ माझा नसून माझ्या कार्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा, माझ्या कुटुंबाचा, सहकाऱ्यांचा आणि देशसेवेसाठी सातत्याने प्रेरणा देणाऱ्या सर्वांचा आहे. राष्ट्रासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची संधी मिळणे हेच माझ्यासाठी खरे भाग्य आहे. आजोबा ह. भ. प. निवृत्तीराव महाराज पाचफुले यांच्याकडून मिळालेल्या समाजकार्याच्या संस्कारांचा आणि मार्गदर्शकांच्या प्रेरणेचा रोहित पाच फुले यांनी उल्लेख केला. देशरत्न २०२५ हा सन्मान आपल्यावर अधिक जबाबदारीची जाणीव करून देतो, असे ते म्हणाले. राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल रोहित पाचफुले यांचे केंद्रीय मंत्री रक्षाताई खडसे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आ. अर्जुनराव खोतकर, चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे , शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत सहानी यांनी अभिनंदन केले.

### शेतकऱ्यांना इंग्रजीतील ...

मांडली. शेतकऱ्यांनी सीसीआय केंद्रावर कापूस खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी केली होती. मात्र, खरेदीच्या दिवशी अचानक स्लॉट बुकिंग रद्द झाल्याचा इंग्रजी भाषेतील मेसेज मोबाईलवर आल्याने कर्मचाऱ्यांनी कापूस खरेदीस सरळ नकार दिला.

या प्रकाराची माहिती मिळताच आमदार अर्जुन खोतकर यांनी थेट सीसीआय केंद्रावरील संबंधित कर्मचाऱ्याशी फोनवरून संपर्क साधला. शेतकऱ्यांना इंग्रजीत आलेला मेसेज कळतो का? ग्रामीण भागातील शेतकरी या भाषेतले संदेश समजून घेणार कसे? असा सवाल करत त्यांनी कर्मचाऱ्यांना खडेबोल सुनावले.

डोकं ठिकाणावर ठेवून काम करा. शेतकऱ्यांना विनाकारण त्रास देऊ नका. त्यांनी कष्टाने पिकवलेला कापूस आहे, तो खरेदी करणे ही तुमची जबाबदारी आहे, अशा शब्दांत आमदार खोतकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

यावेळी आमदार खोतकर यांनी स्पष्ट इशाराही दिला. शेतकऱ्यांचा कापूस तात्काळ खरेदी करा, अन्यथा त्या ठिकाणी स्वतः आमदार येऊन बसतील, असे समजा, असा थेट इशारा त्यांनी सीसीआय कर्मचाऱ्यांना दिला.

आमदारांच्या या इशाऱ्यानंतर संबंधित केंद्रावर कापूस खरेदी सुरू करण्याच्या हालचाली वेगाने झाल्याचे सांगण्यात येते.

शेतकऱ्यांमध्ये संताप, प्रशासनावर नाराजी

ऑनलाईन नोंदणी आणि स्लॉट बुकिंगची प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचा आरोप यावेळी शेतकऱ्यांनी केला. आधीच कर्जबाजारीपणा, निसर्गाची अवकृपा आणि बाजारभावाची अनिश्चितता सहन करणाऱ्या शेतकऱ्यांना अशा तांत्रिक अडचणींमुळे अधिकच त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे.

या घटनेमुळे सीसीआयच्या व्यवस्थापन पद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले असून, ऑनलाईन प्रणालीतील अडचणींचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. शेतकऱ्यांना समजेल अशा भाषेत माहिती देणे आणि नोंदणी रद्द झाल्यास पर्यायी व्यवस्था करणे ही जबाबदारी सीसीआय प्रशासनाची आहे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### जालना प्रशासन ...

प्रभावशाली राजकीय पदाधिकाऱ्यांच्या बाबतीत नियम शिथिल केले जात असतील, तर लोकशाही प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित बेंचवरील राजकीय मजकूर, प्रचारात्मक वाहने तसेच दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती ठोस कारवाई करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासन वेळेत पावले उचलणार की हे प्रकरणही कागदोपत्री चौकशीपुरतेच मर्यादित राहणार, हे येणाऱ्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

## वाचकांचे मनोगत

### कोकणातील जगप्रसिद्ध हापूस आंबावर गुजरातचा बळसाड मात करेल काय, ?

कोकणातील हापूस आंब्याची चव, सुगंध, रंग जगातील कुठल्याही आंब्याला नाही म्हणूनच फळांचा राजा हापूस आंबा म्हणून जगप्रसिद्ध आहे.शात्रीय व कायदेशीर कसोट्यांवर कोकणचा हापूस आंबा मानांकनाचा हक्कदार आहे.कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील हापूस आंब्याची आवक सर्वात जास्त आहे.देवगड, राजापूर, रत्नागिरी तालुके हापूस आंब्याची पंढरी अशी ओळख असलेले तालुके आहेत.गुजरात मधील बळसाड आंब्याची निवड होणे हास्याचे ठरेल.अर्थात महाराष्ट्रातील मोठे उद्योगधंदे गुजरातला जाऊ शकतात तेथे हापूस आंब्याची काय कथा ? हापूस आंब्याच्या लढ्यात कोकण कृषी विद्यापीठाने उडी घेतली आहे.कोकण कृषी विद्यापीठाने बळसाड हापूस आंब्याला मानांकन मिळाल्यास सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे स्पष्ट केले आहे.हापूस आंबा मानांकनासाठी भारतीय किसान संघ व नवसारी कृषी विद्यापीठ नवसारी, गुजरात यांनी अर्ज केल्यानंतर कोकणात संतापाची लाट उसळली आहे.सरकार जरी म्हणत असले आम्ही हापूस आंब्याच्या पाठीशी ठाम आहे.दिल्लीच्या आदेशापुढे किती निभाव लागेल सांगणे कठीण आहे.कोकण कृषी विद्यापीठ आणि कोकणातील हापूस आंबा बागायतदार यांनाच मानांकनासाठी लढाई लढावी लागेल.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# जितेंद्र अग्रवाल यांचा १०० किमी धावण्याचा विक्रम; व्यापारी महासंघातर्फे भव्य सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** राजस्थानमधील जयसलमेर येथे आयोजित १०० किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेत जालना येथील व्यापारी जितेंद्र अग्रवाल यांनी अवघ्या १३ तास ५४ मिनिटांत शंभर किलोमीटर अंतर पूर्ण करून उल्लेखनीय विक्रम प्रस्थापित केला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने विजय विलास येथील बँक्वेट हॉलमध्ये त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात राजस्थानमधील लोंगेवाला चौकी येथे भारतीय सैन्याच्या १२० जवानांनी दाखवलेल्या अतुलनीय शौर्याच्या सन्मानार्थ दरवर्षी ही मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात येते. देशभरातून नामांकित धावपटू या स्पर्धेत सहभागी होतात. यावर्षीच्या स्पर्धेत जालना येथील व्यापारी जितेंद्र अग्रवाल यांनी सहभाग घेत विक्रमी कामगिरी करत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

सत्कार समारंभात बोलताना जितेंद्र अग्रवाल यांनी १०० किलोमीटर अंतर धावण्यासाठी घेतलेल्या मेहनतीचा आणि तयारीचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी व्यापारी वर्गाला चालणे व धावणे याबाबत उपयुक्त टिप्स देत नियमित व्यायाम, धावण्याचे महत्त्व, संतुलित आहार आणि पुरेशी विश्रांती यावर भर दिला. धावण्यामुळे शरीर तंदुरुस्त राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि मानसिक तणाव कमी होतो, असे त्यांनी नमूद केले. आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास विविध आजारांना सामोरे जावे लागते, याची जाणीवही त्यांनी करून दिली. शेवटी आरोग्य हीच खरी संपत्ती आहे हा संदेश देत सर्वांना नियमित व्यायाम करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे महानगर प्रमुख भास्कर आबा दानवे, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे महासचिव शाम लोया, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, महासचिव संजय दाड, विनोद कुमावत, सुभाष देवीदान, इंद्रचंद तवरावाला, अर्जुन गेही, सीए गोविंदप्रसाद मुंदडा, विनोद पवार, राजेश कामड, लक्ष्मीनारायण मानधना, विजय बगडिया, मोहन इंगले, प्रमोद गंडाल, क्रेडाई संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पवार, चेतन मराठे, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज कासलीवाल, संजय अग्रवाल, योगेश पाटनी, वासुदेव देवडे, योगेश ठक्कर, दिलीप अग्रवाल, राजू सेठ जैन, पवन करवा, सुशील मेहरा, अच्युतराव कदम, इमरान भाई यांच्यासह जालना शहरातील मोठ्या संख्येने व्यापारी बांधव उपस्थित होते.

जितेंद्र अग्रवाल यांच्या या विक्रमी यशामुळे व्यापारी वर्गासह युवकांना आरोग्य आणि क्रीडाप्रवृत्तीची नवी प्रेरणा मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### जालना जिल्हा परिषदेचा पुढाकार

# ‘ई-संजीवनी’द्वारे आता घरबसल्या मिळणार मोफत आरोग्य सेवा!

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील नागरिकांसाठी आरोग्य विभागाने एक दिलासादायक बातमी आणली आहे. जिल्हा परिषद आणि जिल्हा रुग्णालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने 'ई-संजीवनी ओपीडी' अंतर्गत आता रुग्णांना घरबसल्या तज्ज्ञ डॉक्टरांचा मोफत सल्ला आणि उपचार घेता येणार आहेत. यासाठी जिल्हा रुग्णालयात विशेष 'टेलीकन्सल्टेशन हब' कार्यान्वित करण्यात आले आहे. तज्ज्ञांची टीम सेवेसाठी सज्ज जिल्हा रुग्णालय जालना येथे स्थापन करण्यात आलेल्या या हबमध्ये ३ तज्ज्ञ विशेषज्ञ आणि २ वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना शहरात न येता वेळेवर उपचार मिळावेत, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. वेळ आणि स्वरूप ही सुविधा सोमवार ते शनिवार या कालावधीत उपलब्ध असेल. यामध्ये सकाळी ९ ते दुपारी १ आणि दुपारी १:४५ ते ५ वाजेपर्यंत नागरिक ऑनलाईन सल्ला घेऊ शकतील. कसा घ्यावा लाभ? (पाच सोप्या स्टेप्स)




नागरिकांनी आपल्या मोबाईलच्या माध्यमातून खालील प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे: नोंदणी: ई-संजीवनीच्या पोर्टलवर जाऊन मोबाईल नंबर सत्यापित (तशीळषू) करणे. टोकन: नोंदणी पूर्ण झाल्यावर टोकन नंबर मिळवणे. लॉगिन: मोबाईलवर सूचना मिळाल्यानंतर पोर्टलवर लॉगिन करणे. कन्सल्टेशन: आपला नंबर आल्यावर व्हिडिओ कॉलद्वारे डॉक्टरांशी संवाद साधणे. ई-प्रिस्क्रिप्शन: डॉक्टरांनी सुचवलेली औषधे (Prescription) डाऊनलोड करून घेणे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे आवाहन वेळेची बचत आणि दर्जेदार उपचार एकाच ठिकाणी मिळवण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी केले आहे.

# शाळा-महाविद्यालयांत २६ डिसेंबरला ‘वीर बाल दिवस’ साजरा करण्याची सिख समाजाची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** येणाऱ्या २६ डिसेंबर रोजी 'चार साहिबजादे' यांच्या अतुलनीय बलिदानाच्या स्मृतीप्रीत्यर्थ जालना जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात यावा, अशी आग्रही मागणी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शिखांचे दहावे गुरु, गुरु गोविंद सिंह जी यांच्या चार साहिबजाद्यांनी धर्माच्या आणि राष्ट्राच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. या थोर वीरांची स्मृती आणि त्यांचा पराक्रम प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात कायम राहावा, या उद्देशाने जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये हा दिवस साजरा होणे आवश्यक आहे.

२६ डिसेंबर हा दिवस भारतीयता आणि धर्माच्या रक्षणासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचे प्रतीक मानले जाते. १७०४ मध्ये याच दिवशी साहिबजाद्यांनी परकीय आक्रमकांसमोर न झुकता हौतात्म्य पत्करले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या शौर्याला मानवंदना देण्यासाठी २६ डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून घोषित केला आहे.

भारताचा बाल दिवस हा मानवतेसाठी बलिदान देणाऱ्या चार साहिबजाद्यांना समर्पित असायला हवा, जेणेकरून येणाऱ्या पिढीला त्यांच्या वीरतेची प्रेरणा मिळेल, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनावर सिकलीकर सिख सामाजिक कार्यकर्ता संतोष कलानी, सतनामसिंग टाक,संदिपसिंग भादा, आकाशसिंग बावरी, करणसिंग भौंड, कुलदीपसिंग जीन्नी ई. च्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गड-किल्ल्यांवरील ‘जीके’ परीक्षेत पूर्वा भोरजेचे घवघवीत यश

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** नवलभाऊ प्रतिष्ठान संचलित, संत मीरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (एन-३) येथील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कु. पूर्वा समाधान भोरजे हिने '१०० शिक्षक क्लब ऑफ जालना' आयोजित राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत विशेष यश संपादन केले आहे. या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने तिचा गौरव करण्यात आला.

युनेस्को जागतिक वारसा स्थळ यादीत समाविष्ट असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ गड-किल्ल्यांच्या माहितीवर आधारित ही 'सामान्य ज्ञान परीक्षा २०२५' आयोजित करण्यात आली होती. यामध्ये पूर्वा भोरजे हिने अत्यंत उत्तम कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

तिच्या या यशाची दखल घेत विद्यालयाचे प्राचार्य श्री. अनिल पाटील सर आणि वर्गशिक्षक श्री. उमेश विंचुरकर सर यांच्या हस्ते तिला प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. ऐतिहासिक वारशाची ओळख आणि सामान्य ज्ञानाची आवड जोपासल्याबद्दल मान्यवरांनी तिचे विशेष कौतुक केले.



या यशाबद्दल शाळेतील शिक्षक वृंद, पालक आणि मित्रमैत्रिणींकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील वाटचालीस आणि आगामी परीक्षांसाठी विद्यालयाच्या वतीने तिला मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# डॉ. बबनराव महामुणे यांची सहाव्या राज्यस्तरीय बालकवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील प्रसिद्ध कवी नाट्य कलावंत साहित्यिक कथाकार, यांची सहाव्या बालकवी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. शिरूर अनंतपाळ येथील ग्रामीण मराठी साहित्य मंच व व आंबेडकरी साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहाव्या राज्यस्तरीय बालकवी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक बालकथाकार टेंभुर्णी ज्यांची कर्मभूमी मानल्या जाते अशा टेंभुर्णी येथील डॉक्टर बबन महामुने यांची अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. ८ फेब्रुवारी २६ रोजी देवरजन प्रसिद्ध अति भेट परिसरात या भव्य संमेलनात भरणार आहे. या संमेलनात बालसाहित्यकांचे कवी संमेलन तसेच बाल साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन सुद्धा होणार आहे. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल तसेच नाट्य क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल तसेच साहित्य क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल आयोजकांनी त्यांना सन्मानपूर्वक पत्र देऊन बाल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आपण स्वीकारावं अशी विनंती नुकतीच त्यांना करण्यात आली आहे. त्यांनी केलेल्या कार्याची या संमेलनाच्या निमित्ताने दखल घेण्यात आली आहे.



बाल साहित्य मनावर संस्काराचे परिणाम व्हावे ही या पाठीमागची भूमिका असून अनेक बालसाहित्यिक या संमेलनात सहभागी होणार आहे या साहित्य जत्रेच्या माध्यमातून या परिसरामध्ये साहित्य क्षेत्राचा उत्सव साजरा होणार आहे सर्वांनी या साहित्य क्षेत्राचा लाभ घ्यावा असे संयोजकाच्या वतीने सांगण्यात आले आहे.




# कुणी, तिकीट देता का रे तिकीट ?

थोर कवी कुसुमाग्रज यांच्या
कुणी, घर देता का रे घर ?
या काव्याचे विडंबन पुढे सादर करीत आहे.
अर्थातच
कवी कुसुमाग्रज यांची क्षमा
मागून.

एक उमेदवार भिंती वाचून
छपरावाचून
माणसाच्या मायेवाचून
देवाच्या दयेपासून
गल्लोगल्ली फिरत आहे
जिथून कुणी उठवणार नाही
अशी जागा धुंडत आहे
कुणी, तिकीट देता का रे तिकीट ?

काय रे बाळा
खरंच सांगतो बाबांनो
उमेदवार आता थकून गेलाय
इकडे तिकडे जमेल तसे
नोकरी,धंदे करून
अर्ध अधिक तुटून
गेलाय
मिनतवार्या करून
हातापाया पडून
घरच्यांची बोलणी
खाऊन
मित्रांची मस्करी सहन
करून
झुंज देऊन देऊन
उमेदवार आता थकून गेलाय
उमेदवाराला आता
झटपट श्रीमंत व्हायचं आहे
म्हणुन
कुणी, तिकीट देता का रे तिकीट ?

खुरडत खुरडत चालत आहे
खरं सांगतो बाबांनो
उमेदवाराला न मिळणारी
उमेदवारीच नडतेय
हे बाबा ,कुणी तिकीट देता का रे तिकीट ?

उमेदवाराला महाल हवा
राजवाड्याचा सेट हवा
पदवी हवी,हार हवा
थैली मधली भेट हवी
हवा एक मोठा व्हिला
पंख मिटून पडण्यासाठी
हवी एक
सोन्याची आरामखुर्ची
उमेदवाराला बसण्यासाठी
एक मर्सिडीज हवी
पुढच्या दारात
सरकारांना फिरण्यासाठी



कुणी तिकीट देता का रे तिकीट ?

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# वेळेवर व प्राथमिक उपचारांसाठी आरोग्य उपकेंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची

## देवठाणा (उ.) येथे ५९ लाख रुपयांच्या आरोग्य उपकेंद्राचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते उदघाटन

**मंठा । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ व वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने मंठा तालुक्यातील देवठाणा (उ.) येथे उभारण्यात आलेल्या ५९ लाख रुपये खर्चाच्या नवीन आरोग्य उपकेंद्राचे उद्धाटन माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, ग्रामीण भागात आरोग्य उपकेंद्रांची नितांत गरज आहे. आजारपणाच्या वेळी प्राथमिक उपचारांसाठी गावाबाहेर जाण्याची अडचण दूर करण्यासाठी अशी आरोग्य उपकेंद्रे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. वेळेवर उपचार मिळाल्यास गंभीर आजारांचे प्रमाण कमी करता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

नवीन आरोग्य उपकेंद्रामुळे देवठाणा व परिसरातील नागरिकांना मूलभूत आरोग्य सुविधा गावातच उपलब्ध होणार असून, याचा थेट फायदा सर्वसामान्य नागरिकांना होणार असल्याचेही आमदार लोणीकर यांनी नमूद केले. या केंद्रामार्फत मातृ व बाल आरोग्य सेवा, लसीकरण,



प्राथमिक उपचार, आरोग्य तपासणी, सल्ला तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळणार आहे. विशेषतः गर्भवती महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक व गरीब कुटुंबांसाठी हे केंद्र वरदान ठरणार आहे.

ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, कोणत्याही नागरिकाला उपचाराअभावी त्रास सहन करावा लागू नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले. आरोग्य हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या आरोग्य उपकेंद्रात आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधसाठा, स्वच्छता व्यवस्था तसेच प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी उपलब्ध करण्यात येणार आहेत. या केंद्रामुळे आजारांचे लवकर निदान होऊन रुग्णांना वेळेवर व योग्य उपचार मिळण्यास मदत होणार आहे. यासोबतच आरोग्य जनजागृती, पोषण आहार मार्गदर्शन व रोगप्रतिबंधक उपाययोजनांवरही भर देण्यात येणार असल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी या आरोग्य उपकेंद्रामुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

ग्रामस्थांनी शासन व लोकप्रतिनिधींचे आभार मानत या केंद्राचा योग्य व प्रभावी वापर करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी गणेशराव खवणे, नितीन राठोड, राजेश मोरे, पंजाबराव बोराडे, डॉ. दत्तात्रय काकडे, भाऊसाहेब गोरे, अजय अवचार, विठ्ठलराव काळे, शिवाजीराव जाधव, विलास घोडके, सुरेश सरोदे, रामकिसन बोडके, गजानन देशमुख, अमोल मोरे, दारासिंग चव्हाण, पंकज राठोड, पवन खंदारे, किशोर खंदारे, गोविंदराव देशमुख, विष्णुपंत मोरे, शरद पाटील, रामेश्वर देशमुख, विष्णू राठोड, प्रवीण शेजुळे, रमेश मोरे, पप्पू मोरे, बाबासाहेब मोरे, रघुनाथ शिंदे, भगवान देशमुख, जनार्दन मोरे, आसाराम मोरे, सोपानराव पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या इच्छुक उमेदवाराच्या मुलाखतीला मोठा प्रतिसाद

## मिरवणुकीने वाजत गाजत इच्छुक उमेदवार कार्यकर्ते पोहोचले पक्ष कार्यालयात

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित दादा ) पक्षातील सक्षम आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना उमेदवारी देणार असल्याचे पक्षनिरीक्षक माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती प्रसंगी आयोजित बैठकीत सांगितले.

जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पक्षाच्या वतीने बुधवार रोजी जिल्हा पक्ष कार्यालयात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण हे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पक्षनिरीक्षक श्री आजबे यांचा शाल पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर शकुंतला ताई कदम, धैर्यशील चव्हाण, शहा आलम खान, चंद्रकांत कारके, वंदना खांडेभराड, महिला जिल्हाध्यक्षा मंगलाताई पाटील,अण्णासाहेब चितेकर , प्रभाकर घेवंदे , प्रा. सोपानराव तेलगड, विठ्ठल बरकुले सतीश वाहुळे आदी मान्यवर उपस्थित होते पुढे बोलताना श्री आजबे म्हणाले की जिल्ह्यातील पक्ष कार्यकर्त्यांना पक्षाच्या माध्यमातून पूर्ण ताकद देण्यात येईल सर्व कार्यकर्त्यांनी एकजूट होऊन संघटनात्मक ताकद निर्माण करणे गरजेचे आहे निवडणुकीत उमेदवारांनी आपली ताकद आणि कसोशीचे प्रयत्न केल्याशिवाय गत्यंतर नाही.

जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण बोलताना म्हणाले की जालना महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दोन अंकी विजयी संख्या मिळणार असून आमच्या शिवाय कोणालाही महापौर करता येणार नाही श्री चव्हाण म्हणाले की महायुती आणि युती संदर्भात बोलणी सुरू आहे युती न झाल्यास



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सर्व जागा लढण्याची तयारी ठेवली आहे.

**मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकावर मधुकरराव आर्दड**

प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड बोलताना म्हणाले की मराठवाड्यात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा दुसऱ्या क्रमांकावर राहिलेला आहे , महापालिकेच्या निवडणुकीत नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुकी समोर गेल्यास निश्चितपणे मोठे यश मिळेल असे श्री आर्दड यांनी सांगितले.

मिरवणूकीने वाजत गाजत इच्छुक उमेदवार पक्ष कार्यालयात पोहचल्याने यावेळी इच्छुकांची मोठी गर्दी उफाळून आली होती , मुलाखती दरम्यान एका सिव्हिल इंजिनिअर कु. सांची म्हस्के प्रभाग क्रमांक १५ मधून उमेदवारीची मुलाखत दिली तर निर्मलाबाई सले या अपंग महिलेने प्रभाग क्रमांक ६ मधून उमेदवारी मिळण्यासाठी मुलाखत दिली हे विशेष होय.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शेख. महेमूद यांनी सांगितले शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सक्षमपणे उभा राहात आहे १६ प्रभागातील ६५ जागेवर पक्षाने निवडणुकीची तयारी केली आहे,

यावेळी पक्षातील सक्रिय कार्यकर्त्यांनी मुलाखती दिल्या आहेत .

### जालन्यात आगामी निवडणुकीचे रणशिंग!

# शिवसेना; इच्छुक उमेदवारांची 'तुफान गर्दी'



**जालना । प्रतिनिधी** - आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालन्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. येथील शिवसेना कार्यालयावर आयोजित इच्छुक नगरसेवक उमेदवारांच्या मुलाखतींना इच्छुकांनी तुफान गर्दी केली होती. अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली या मुलाखती अत्यंत उत्साहात पार पडल्या.

**सक्षम उमेदवारांच्या निवडीवर भर** या मुलाखतींदरम्यान आगामी निवडणुकीत जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे, सक्षम आणि कार्यक्षम उमेदवार निवडण्यावर सखोल चर्चा करण्यात आली. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सर्व इच्छुकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पक्षाची विचारधारा आणि विकासाभिमुख राजकारण हीच आपली ताकद आहे. उमेदवारांनी जनतेशी थेट संवाद ठेवून तळागाळातील समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहावे.

प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या महत्त्वपूर्ण प्रक्रियेवेळी शिवसेनेची मोठी फळी उपस्थित होती. यामध्ये प्रामुख्याने: भास्करराव आंबेकर (संपर्कप्रमुख) भाऊसाहेब घुगे (जिल्हाप्रमुख) विष्णु पाचफुले व आत्मानंद भक्त (शहरप्रमुख) फिरोज लाला तांबोळी, बाला परदेशी यांच्यासह युवासेना व इतर संलग्न संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**इच्छुकांनी मांडला विकास आराखडा**

मुलाखतीसाठी आलेल्या इच्छुकांनी केवळ गर्दीच केली नाही, तर आपल्या प्रभागातील समस्या आणि भविष्यातील विकास आराखड्याची (व्हिजन) माहिती पक्षश्रेष्ठींसमोर प्रभावीपणे मांडली. शिवसेना ही सर्वसामान्यांची संघटना असून, निष्ठावान कार्यकर्त्याला नक्कीच न्याय दिला जाईल, असा विश्वास यावेळी नेत्यांनी व्यक्त केला.

राजकीय वारे जोरात

शिवसेना कार्यालयाबाहेरील जनसमुदाय आणि इच्छुकांच्या रांगा पाहता, आगामी निवडणुकीत शिवसेना मोठ्या ताकदीने उतरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या गर्दीने शिवसेनेचे संघटनात्मक बळ पुन्हा एकदा अधोरेखित केले असून विरोधकांचे लक्षही या घडामोडींकडे लागून राहिले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीवर भानुदास दोबाले यांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (छडड) सल्लागार समितीच्या सदस्यपदी जालन्यातील सामाजिक कार्यकर्ते श्री. भानुदास दोबाले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती विद्यापीठाचे माननीय कुलगुरू यांच्या मान्यतेने करण्यात आली असून, याबाबतचे अधिकृत नियुक्तीपत्र नुकतेच जाहीर करण्यात आले आहे.



श्री. भानुदास दोबाले यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक तसेच युवक प्रबोधनाच्या क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. ग्रामीण भागातील युवकांसाठी मार्गदर्शन, समाजोपयोगी उपक्रम, स्वयंसेवी चळवळी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचे सक्रिय योगदान राहिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच त्यांची राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर नियुक्ती सन २०२५-२६ व २०२६-२७ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी असून, या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध कार्यक्रमांना त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभणार आहे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, सिनेट सदस्य प्रा. नाना गोडबोले, डॉ. विठ्ठल राजकर, मा. सरपंच शिवाजी बामणे, आर्ट ऑफ लिविंग प्रशिक्षक माऊली दोबाले, योगेश हेंद्रे, जालिंदर चोरमले, संतोष काकडे, अमर शिंदे यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक व स्वयंसेवी क्षेत्रातील मान्यवरांकडून श्री. भानुदास दोबाले यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


## नाशिकमध्ये महायुती

**नाशिक -** एकीकडे ठाकरे बंधूंची युती जाहीर झाल्यानंतर दुसरीकडे नाशिकमधील महायुतीचा जागावाटपाचा पेच संपल्याची माहिती आहे. नाशिक महापालिकेमध्ये भाजप सर्वाधिक जागा लढवणार असून शिंदेंच्या शिवसेनेसमोर २५ ते ३० जागांचा प्रस्ताव ठेवल्याची माहिती आहे. भाजपचा हा प्रस्ताव शिवसेनेला मान्य असल्याचीही माहिती आहे.

### महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

# सर्व कर्मचाऱ्यांनी पूर्ण क्षमतेने काम करावे

## जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल





**जालना । प्रतिनिधी -** निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि त्रुटीविरहित पार पाडण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी पूर्ण क्षमतेने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा दुवा असलेल्या मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांचे सखोल प्रशिक्षण बुधवार दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी सेंट मेरी हायस्कूल येथे दोन सत्रांत पार पडले. या प्रशिक्षणास जिल्हाधिकारी तथा पी महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन केले. दरम्यान, प्रशिक्षणास अनुपस्थित राहिलेल्या १६५ कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कडक पावले उचलत त्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावली आहे.

**प्रशिक्षणार्थींची घेतली 'परीक्षा'**

निवडणूक इतिहासात प्रथमच प्रशिक्षणादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. प्रशिक्षणार्थींना प्रश्नपत्रिका देऊन त्यांचे निवडणूक विषयक ज्ञान आणि प्रशिक्षणाचे आकलन तपासण्यात आले. या अभिनव उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रशिक्षणाबाबत कमालीची गांभीर्याने दिसून आली.

**उपस्थिती आणि गैरहजेरीचा तपशील**

निवडणूक कार्यासाठी एकूण २,७१३ अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यापैकी २,५४८ कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित होते, तर १६५ जण गैरहजर राहिले. मतदान केंद्राध्यक्षः ६७३ पैकी ५५ अनुपस्थित. मतदान अधिकारी-१: ५५० पैकी १३ अनुपस्थित. मतदान अधिकारी-२: ५८५ पैकी ३६ अनुपस्थित. मतदान अधिकारी-३: ९०५ पैकी ६१ अनुपस्थित. गैरहजर राहिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या दृष्टीने नोटीस पाठविण्यात आलेल्या आहे.

**तज्ज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

प्रशिक्षणाचे पहिले सत्र सकाळी १० ते १ या वेळेत उपविभागीय अधिकारी श्री. रामदास दौड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तर, दुसरे सत्र दुपारी २ ते ५ या वेळेत श्री. विजय चव्हाण, तहसीलदार अंबड यांनी घेतले. यावेळी मतदान यंत्रांची (एतच्) हाताळणी, मतदानाची गोपनीय प्रक्रिया आणि आपत्कालीन परिस्थितीतील नियोजन यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

हे महाप्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, महापालिका उपायुक्त नंदा गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी जालना महानगरपालिकेचे सर्व मनुष्यबळ व्यवस्थापन पथकाने परिश्रम घेतले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.